आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१७ मार्च २०२४ - रविवार

निवडणूक आयोगानं लोकसभा आणि चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर आदर्श आचार संहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्व जारी केली आहेत. यासंदर्भात निवडणूक आयोगानं कॅबिनेट सचिव, सर्व राज्यांचे मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांना यासंदर्भात पत्र पाठवलं आहे. सार्वजनिक ठिकाणांवरचे राजकीय जाहिराती असलेले सर्व अनधिकृत फलक हटवण्याचे निर्देश आयोगानं दिले आहेत. या काळात राजकीय पक्ष किंवा उमेदवाराला निवडणूक प्रचारात सरकारी वाहन वापरता येणार नाही, सरकारी लाभ सांगणाऱ्या जाहिराती प्रसारीत करता येणार नाहीत, प्रत्येक राज्यांचे मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी अशा जाहिराती रोखण्यासाठी कारवाई करावी, राज्य सरकारी विभागांच्या संकेतस्थळांवरून राजकीय कार्यक्रमांची माहिती तातडीनं हटवावी असं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

या मार्गदर्शक तत्वांनुसार मतदार जागरूकतेसाठी रेडियो, दूरचित्रवाणी, सिनेमा आणि सरकारी वाहिन्यांच्या माध्यमातून कार्यक्रमांचं प्रसारण करता येणार आहे.

<><><><><><>

अधिकार तसंच विचारांचं केंद्रीकरण झालेली भाजपची विचारसरणी आणि काँग्रेसची सर्वसमावेशक विचारसरणी असा लढा आपल्याला लढायचा असल्याची भावना काँग्रेस नेते, खासदार राहुल गांधी यांनी व्यक्त केली. ते आज मुंबईत मणीभवन ते ऑगस्ट क्रांती मैदानापर्यंत काढलेल्या न्याय संकल्पयात्रेत बोलत होते. देशातल्या सर्वच समाजघटकांवर अन्याय होतोय, मात्र अनेकांना इतरांवरील अन्यायाची कल्पना नसल्यानं, सत्तेविरोधात आंदोलन उभं राहत नसल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली.

दरम्यान, आज संध्याकाळी शिवाजी पार्क इथं भारत जोडो यात्रेची समारोप सभा होणार आहे.

<><><><><>

राज्यात लोकसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न सुरू असल्याचं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी म्हटलं आहे. भारत निवडणूक आयोगानं लोकसभा निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केल्यानंतर ते काल मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. यावेळी त्यांनी राज्याच्या निवडणूक तयारीविषयी माहिती दिली. सद्यस्थितीत राज्यात ९ कोटी २० लाख ३१ हजार ७० मतदारांची नोंद आहे, यंदा राज्यात सुमारे ९८ हजार मतदान केंद्र उभारण्याचं नियोजन असल्याचं, त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रीय स्वयंसेवक संघांच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेला उपस्थित राहण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे पी नड्डा काल रात्री उशीरा नागपूरला आले. दरम्यान, या सभेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे सहकार्यवाह म्हणून दत्तात्रय होसबळे यांची पुन्हा निवड झाली. सहकार्यवाह म्हणून होसबळे 2021 पासून कार्यरत आहेत.

<><><><><>

यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे हळदीची लागवड घटली असूनही वाशीम जिल्ह्यात हळदीच्या भावाने आतापर्यंतचा विक्रमी टप्पा पार केला. रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीत कांडी हळदीला कमाल १८ हजार २०० रुपये प्रतिक्विंटलचा दर मिळाला. कमी उत्पादन आणि चांगली मागणी यामुळे हळदीचे

भाव वाढल्यानं हळद उत्पादकांना दिलासा मिळाला आहे. बाजारात हळदीची आवकही वाढली आहे.

<><><><><>

राज्य शासनानं मराठा आरक्षणासाठी काढलेल्या अधिसूचनेतल्या सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करावी, मराठा आंदोलकांवरचे गुन्हे मागं घ्यावेत, या मागण्यांचा पुनरुच्चार मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. आंतरवाली इथल्या लाठीहल्ल्याच्या घटनेची यापूर्वी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी योग्य चौकशी केली. मग आता एस.आय.टी.चौकशी कशी लावली, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, भाजपा नेते अशोक चव्हाण यांनी काल रात्री उशिरा अंतरवाली सराटीत येऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली.

<><><><><>

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील कन्हेरवाडीच्या नागरिकांनी त्यांच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आज धरणं आंदोलन केलं. या भागात पाणी टंचाई असल्यानं लघु सिंचन धरणातलं पाणी नदीपात्रात सोडलं जावं, या प्रमुख मागणीसाठी ग्रामस्थांनी धरणं आंदोलन केलं होतं.

<><><><><>

NIA अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं पुण्यातील आयसिस मॉड्यूल प्रकरणात पुण्यातल्या चार स्थावर मालमत्ता 'दहशतवादाचं उत्पन्न' म्हणून जप्त केल्या आहेत. या मालमत्तांचा वापर स्फोटकं बनवणं आणि दहशतवादी कृत्यांचं प्रशिक्षण आणि नियोजनासाठी केला जात होता. NIA नं या प्रकरणात सर्व 11 आरोपपत्रं आधीच दाखल केली आहेत.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१७  मार्च २०२४ - रविवार

<><><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात अंतिम सामना होणार आहे. नवी दिल्लीतल्या अरूण जेटली स्टेडियमवर हा सामना होईल. संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

//<><><><><><>//